म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र. १/२०२१
वैशाली –वि– दिपक

MHBU150000272021

**आदेश निशाणी क्रमांक ०३ खाली**
(पारीत दिनांक ०८.०४.२०२६)

अर्जदारांने प्रस्तुतचा अर्ज कलम २३ घरगुती हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ अन्वये गैरअर्जदार क्र. १ कडुन अंतरिम खावटी, संरक्षण आदेश, निवास आदेश व घरभाडे मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

०२) अर्जदारांचा अर्ज व गैरअर्जदार क्र. १ चा नि.क्र. १५ अन्वये दाखल केलेले म्हणणे याचे अवलोकन केले. अर्जासोबत अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ ने दाखल केलेल्या कागदपत्राची बारकाईने पाहणी केली.

०३) अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ च्या विधीज्ञ यांचा प्रदीर्घ युक्तिवाद ऐकला.

०४) गैरअर्जदार क्र. १ च्या वकीलाने त्याच्या युक्तिवादाच्या समर्थनास खालीलप्रमाणे मा. सर्वोच्च व उच्च न्यायालय यांचे न्यायनिवाडे दाखल केले.

***अ.ममता जयस्वाल विरुध्द राजेश जयस्वाल एलएडबल्युएस(एमपीएच) २०००–३–३८.***

***ब.अंकित साहा विरुध्द उत्तरप्रदेश सरकार व इतर २०२५ एससीसी ऑनलाईन ऑल ८५१२: २०२६(१).***

०५) वर नमुद दोन्ही न्यायनिवाड्याचा बारकाईने अभ्यास केला. तसेच, न्यायनिवाडयामधील तत्व आदेश पारीत करतांना विचारात घेण्यात आले.

०६) अंतरिम अर्ज, सोबत जोडलेले शपथपत्र, मुळ अर्ज, कौटुंबिक

हिंसाचार अहवाल, अर्जदार व गैरअर्जदार यांनी दाखल केलेले मालमत्ता व जबाबदा–याचे शपथपत्र या सर्व बाबींचा विचार करता प्रस्तुत अर्जाच्या निकालासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात, त्यांचे निष्कर्ष खालीलप्रमाणे कारणांसह नोंदविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अर्जदार हिने प्रथमदर्शनी असे सिध्द केले काय की, गैरअर्जदारांने तिचा कौटुंबिक हिंसाचार केला आहे का? | होय. |
| २) | अर्जदार हिने असे सिध्द केले का की, ती तिचा व अर्जदार क्र. २ चा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे का? | होय. |
| ३) | अर्जदार हिने असे सिध्द केले आहे का की, ती तिच्यासाठी व अर्जदार क्र. २ साठी गैरअर्जदार क्र. १ कडुन अंतरीम पोटगी रक्कम रुपये १५,०००/– मिळण्यास पात्र आहे का? | अंशतः होय. |
| ४) | अर्जदार हिने असे सिध्द केले आहे का की, ती संरक्षण आदेश, निवासी व घरभाडे आदेश मिळण्यास पात्र आहे का? | अंशतः होय. |
| ५) | असल्यास किती? | अर्जदार क्र. १ व २ यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रुपये २०००/– (प्रत्येकी रक्कम रुपये दोन हजार फक्त). |
| ६) | आदेश काय? | अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो. |

## –: <u>कारणमिमांसा</u> :–

**<u>मुद्दा क्र.१ करीता</u>** :

०७) अर्जदार हिने सदरचा अर्ज प्रतिज्ञालेखावर सादर केला आहे. अर्जदाराच्या मुळ अर्जाचे अवलोकन केले. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार तिचे लग्न गैरअर्जदार क्र. १ सोबत दिनांक २४/०५/२०११ रोजी शिवाजी हायस्कुल, देऊळगांव राजा येथे ख्रिश्चन धर्माच्या रितीरिवाजाप्रमाणे संपन्न झालेले आहे. लग्नानंतर ती गैरअर्जदार क्र. १ सोबत त्याच्या घरी नांदायला गेली. सर्व गैरअर्जदारांने सुरुवातीचे चार महिने तिला चांगले नांदवले. त्यानंतर, तिला मानसिक व शारीरिक छळ करण्यास सुरुवात केली. अर्जदाराला सर्व गैरअर्जदार घरातील सर्व कठीण कामे करण्यास सांगत असत व दिवसा–दिवसा उपाशीपोटी ठेवत असत. तसेच, अर्जदाराला गर्भधारणा झाल्यानंतर गैरअर्जदार क्र. १ हा गर्भपात करण्यासाठी तगादा लावत होता. अर्जदाराने गर्भपात नाही केल्यामुळे गैरअर्जदार क्र. १ ने तिला बेदम मारहाण करुन तिला घराबाहेर हाकलुन दिले. त्यामुळे, नाईलाजास्तव ती तिच्या माहेरी राहत होती. त्यानंतर, काही दिवसांनी अर्जदाराला तिचे सासु–सासरे तिच्या माहेरी आले व तिला नांदण्याठी घेवुन गेले असता सुरुवातीस काही दिवस त्यांनी चांगले नांदविले. त्यानंतर, गैरअर्जदार हा अर्जदार क्र. १ ला मोटर सायकल घेण्याकरीता ५०,०००/– रुपयाची मागणी करु लागले. तसेच, तिच्या गळ्यातील सोन्याची पोत व सोन्याचे इतर दागिने त्यांनी जबरदस्तीने हिसकावुन घेतले व म्हणाले की, "तु ५०,०००/– आणल्यास तुझे दागिने परत करु" असे म्हणुन तिला बेदम मारहाण केली व तिला

घराबाहेर हाकलुन दिले.

०८) याउलट, गैरअर्जदार क्र. १ ने नि.क्र. १५ वर त्याचे म्हणणे दाखल करुन अर्जदारासोबत त्याचा विवाह झाला होता ही बाब कबुल केली आहे व लग्नसंबंधातुन अर्जदार क्र. २ हा मुलगा झाला असल्याची बाब सुध्दा त्याने कबुल केली आहे. तसेच, इतर सर्व मजकुर नाकबुल केले आहे. परंतु, पुढे त्याने असे नमुद केले आहे की, अर्जदार इतर गैरअर्जदारांपासुन वेगळे राहण्यासाठी गैरअर्जदार क्र. १ कडे तगादा लावत होती व हट्ट धरत होती. गैरअर्जदार क्र. १ ने तिला समजावुन सांगितले असता, ती ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हती. उलट, ती गैरअर्जदार क्र. १ च्या आई–वडीलांना घालुन पाडुन बोलुन अपमान करीत होती व दरम्यान ती जुलै २०११ मध्ये गैअर्जदारासोबत भांडण करुन तिच्या माहेरी स्वतः निघुन गेलेली आहे. गैरअर्जदारांनी तिला परत आणण्याचा प्रयत्न केला असता, ती आली नाही. त्यामुळे, दिनांक १३/०८/२०१२ रोजी तिला नोटीस पाठवुन नांदण्यास येण्याची विनंती केली. नोटीस मिळाल्यानंतर ती नांदण्यास आली व ८ ते १० दिवस थांबली. त्यानंतर, गैरअर्जदारांसोबत भांडण करुन ती पुन्हा तिच्या माहेरी निघुन गेली. गैरअर्जदारांने अर्जदाराचा कोणत्याही प्रकारे कौटुंबिक छळ केलेला नाही.

०९) अर्जदाराने अर्जामध्ये गैरअर्जदारांविरुध्द तिचा लग्नानंतर कौटुंबिक हिंसाचार, मानसिक व शारीरिक छळ केला हि बाब नमुद केली आहे. अर्जदाराने सदरचा अर्ज शपथेवर सादर केलेला आहे. गैरअर्जदारांच्या वकीलाने असा युक्तिवाद केला की, अर्जदाराचा गैरअर्जदारांने कोणताही कौटुंबिक हिंसाचार केलेला नाही. येथे हे नमुद करणे फायद्याचे राहिल की, गैरअर्जदारांने अर्जदाराचा

कौटुंबिक हिंसाचार केला किंवा कसे हि बाब प्रकरणाच्या अंतिम सुनावणीनंतर निश्चीत होईल. परंतु, सदर अर्जावर आदेश पारीत करतांना केवळ हि गोष्ट पाहणे आवश्यक आहे की, अर्जदार हि कौटुंबिक हिंसाचाराची पिडीत व्यक्ती आहे किंवा नाही. अर्जदार हिने शपथेवर तिचा गैरअर्जदारांने कौटुंबिक छळ केला हि बाब नमुद केलेली आहे. मुळ अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, गैरअर्जदारांने अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार केलेला आहे. तसेच अभिलेखावर संरक्षण अधिकारी देऊळगांव राजा यांनी नि.क्र. ०५ अन्वये दाखल केलेले कौटुंबिक हिंसाचार अहवालाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदाराला लग्नानंतर दुस–या दिवसापासुन शिवीगाळ करुन मारहाण करण्यास सुरुवात केली. तसेच, तिच्या वडीलांकडुन ५०,०००/– रुपयाची मागणी केली व इतर गैरअर्जदारांनी सुध्दा अर्जदाराला शारीरिक व मानसिक त्रास दिल्याची बाब कौटुंबिक हिंसाचार अहवालात प्रथमदर्शनी दिसुन येते. करीता, गैरअर्जदारांने अर्जदार हिचा मानसिक, शारीरिक व आर्थिक छळ केला असल्याची बाब प्रथमदर्शनी दिसुन येते. सबब, मी मुद्दा क्र. १ चे उत्तर **होकारार्थी** नोंदवित आहे.

<u>मुद्दा क्र.२ ते ५ करीता</u> :

१०) अर्जदार क्र. १ ने तिच्या अर्जामध्ये गैरअर्जदार क्र. १ कडुन तिच्या व तिच्या मुलासाठी एकत्रित मिळुन रक्कम रुपये १५,०००/– अंतरीम पोटगीची मागणी केली आहे. तसेच, तिने कलम २३ प्रमाणे संरक्षण आदेश, निवासी आदेश व घरभाडे रक्कम रुपये ३,०००/– ची मागणी केली आहे. त्याकामी, येथे हे नमुद

करणे आवश्यक आहे की, महिलांचे कौटुंबिक हिंसाचारा पासुन संरक्षण कायदा कलम २३ नुसार अर्जदार ही अंतरीम खावटी व इतर मागण्या मिळण्यासाठी अर्ज सादर करु शकते. सदरचे कलम याठिकाणी सोयीसाठी उदृत करणे योग्य होईल.

> **Sec. 23** : Power to grant interim and ex-parte orders.- (1) In any proceeding before him under this Act, the Magistrate may pass such interim order as he deems just and proper.
>
> (2) If the Magistrate is satisfied that an application prima facie discloses that the respondent is committing, or has committed an act of domestic violence or that there is a likelihood that the respondent may commit an act of domestic violence, he may grant an ex parte order on the basis of the affidavit in such form, as may be prescribed, of the aggrieved person under section 18, section 19, section 20, section 21 or, as the case may be, section 22 against the respondent.

**११)** वरील कलम २३(१) नुसार न्यायालयास योग्य व उचित अंतरीम आदेश या कलमा अंतर्गत प्रलंबीत प्रकरणामध्ये पारीत करता येतो.

**१२)** अर्जदार क्र. १ हिने तिच्यासाठी व तिच्या मुलासाठी एकुण १५,०००/– रुपये अंतरीम खावटी मिळण्याची मागणी केली आहे. अर्जदार हिने सदर अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, गैरअर्जदार क्र. १ हे व्यवसायाने बांधकाम ठेकेदार असुन त्याला सदरच्या व्यवसायामधुन दरमहा रक्कम रुपये ६०,०००/– ते ७०,०००/– रुपये मासिक उत्पन्न मिळते. तसेच, अर्जदार क्र. १ चे सासरे हे सेवानिवृत्त झालेले असुन त्यांना अंदाजे २५,०००/– निवृत्ती

वेतन मिळते. त्यामुळे, गैरअर्जदार क्र. १ वर अर्जदारांशिवाय कोणाचीही जबाबदारी नाही. गैरअर्जदार यांनी अर्जदार क्र. १ ला तिच्या मुलासह तिच्या अंगावरील असलेले सोन्याचे दागिने हिसकावुन घेऊन तिला हाकलुन दिलेले आहे. त्यादिवशी, पासुन अर्जदारांची गैरअर्जदार क्र. १ ने कुठल्याही प्रकारे राहण्याची, खाण्या–पिण्याची, दवाखाने, औषधांची व इतर दैनंदिन गरजा पुर्ण केलेले नाही. अर्जदार हिला कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. त्यामुळे, अर्जदार हिने तिच्यासाठी व तिच्या मुलासाठी अशी एकुण १५,०००/– अंतरीम खावटी मिळण्याची विनंती केली आहे. अर्जदाराच्या वकीलाने युक्तिवाद केला की, गैरअर्जदाराचा ठेकेदाराचा व्यवसाय असुन त्यास महिन्याला ६०,०००/– ते ७०,०००/– रुपये उत्पन्न मिळते. परंतु, अर्जदाराने गैरअर्जदार ठेकेदार असल्याची बाब तसेच त्याला महिन्याला ६०,०००/– ते ७०,०००/– रुपये उत्पन्न मिळते किंवा कसे ही बाब दाखविण्यासाठी कोणताही दस्त व पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. करीता, गैरअर्जदार क्र. १ ला अर्जदार सांगते त्याप्रमाणे उत्पन्न मिळते हे देखील अभिलेखावरुन दिसुन येत नाही. गैरअर्जदारांच्या वकीलाने युक्तिवाद केला की, गैरअर्जदार क्र. १ हा आजारी असुन त्याला कोणतेही कामधंदा होत नाही. त्याबाबत, गैरअर्जदार क्र. १ च्या वकीलांनी गैरअर्जदार क्र. १ हा आजारी असल्याबाबतचे काही कागदपत्र अभिलेखावर दाखल केलेले आहे. येथे हे नमुद करणे आवश्यक आहे की, गैरअर्जदार क्र. १ हा आजारी आहे किंवा कसे व त्याला कोणतेही कामधंदा होत नाही ही बाब प्रकरणाची चौकशी होऊन दोन्ही बाजुचा शपथेवर पुरावा घेऊन अभिलेखावर येईल.

१३) गैरअर्जदार क्र. १ ने नि.क्र. २१ वर त्याचे मालमत्ता व जबाबदा–याचे शपथपत्र दाखल केले आहे. सदर शपथपत्राचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, गैरअर्जदार क्र. १ हा कोणताही कामधंदा करीत नाही असे नमुद केले आहे. परंतु, येथे हे नमुद करणे आवश्यक आहे की, गैरअर्जदार क्र. १ चे वय त्याच्या शपथपत्रामध्ये ३५ वर्ष नमुद आहे. त्यामुळे, आजच्या परिस्थितीमध्ये तो काही ना काही कामधंदा करीत असेल. याउलट, गैरअर्जदार क्र. १ ने नमुद केले की, अर्जदार क्र. १ ही खाजगी दवाखान्यामध्ये नर्स म्हणुन नोकरीस आहे व तिला २०,०००/– रुपये उत्पन्न मिळते. परंतु, सदरची बाब सिध्द करण्याकरीता गैरअर्जदार क्र. १ ने अभिलेखावर कोणतेही दस्त दाखल केलेले नाही. त्यामुळे, अर्जदार क्र. १ ही नर्स म्हणुन नोकरी करते ही बाब विश्वासहार्य वाटत नाही.

१४) अर्जदार हिने सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. गैरअर्जदार क्र. १ ने त्याच्या जबाबामध्ये कबुल केले आहे की, अर्जदार क्र. १ सोबत त्याचा विवाह झालेला आहे व त्यांचे नातेसंबंध त्याने मान्य केलेले आहे. तसेच, अर्जदार क्र. २ हा त्याचा मुलगा असल्याची बाब त्याला मान्य आहे. अभिलेखावरील सर्व कागदपत्रांचे तसेच अर्जदाराच्या अर्जातील कथनाचे अवलोकन केल असता असे दिसुन येते की, गैरअर्जदारांने अर्जदार हिला मानसिक व शारिरीक त्रास देऊन घरातुन हाकलुन दिल्याची बाब प्रथमदर्शनी सिध्द होते. तसेच, अर्जदार क्र. १ ही तिचा व तिच्या मुलाचा सांभाळ करण्यासाठी असमर्थ असल्याचे दिसुन येते. अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार क्र. १ ची पत्नी व अर्जदार क्र. २ हा मुलगा आहे.

त्यामुळे, पत्नी व मुलाची सांभाळ करण्याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी त्याच्यावर आहे. तो त्याची कायदेशीर व नैतिक जबाबदारी टाळु शकत नाही. सबब, अर्जदार क्र. १ व २ हे गैरअर्जदार क्र. १ कडुन पोटगी मिळण्यास पात्र आहे. सध्याची महागाईचा विचार करता अर्जदार यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रुपये २,०००/– रुपये पोटगी मंजुर करणे योग्य व न्यायोचित ठरेल.

**१५)** अर्जदारांने कलम २३ प्रमाणे संरक्षण आदेश, निवासी आदेश व घरभाडे रक्कम रुपये ३,०००/– महिना मिळण्याची विनंती केली आहे. अभिलेखावरुन गैरअर्जदारांने अर्जदार क्र. १ हिचा कौटुंबिक हिंसाचार केला असल्याची बाब प्रथमदर्शनी दिसुन येते. त्यामुळे, भविष्यात त्यांच्याकडुन अर्जदार क्र. १ हिचा कौटुंबिक हिंसाचार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता, अर्जदार क्र. १ हि संरक्षण आदेश मिळण्यास पात्र आहे. पुढे अर्जदार क्र. १ हिने निवास आदेश व घरभाडे मिळण्यासाठी विनंती केली आहे. परंतु, अर्जदार क्र. १ च्या अर्जामधील कथनाचा विचार करीता ती सध्या तिच्या माहेरी तिच्या आई–वडीलांकडे राहत असल्याची बाब दिसुन येते. त्यामुळे, सध्याच्या परिस्थितीमध्ये तिला वेगळ्या निवासाची गरज असल्याची दिसुन येत नाही. अर्जदार क्र. १ हिने तिला घरभाडे मिळण्याची विनंती केली आहे. परंतु, ती कोठे व कोणाच्या घरात भाड्याने राहत आहे. ही बाब दाखविण्यासाठी तिने अभिलेखावर कोणताही दस्त व पुरावा दाखल केला नाही. त्यामुळे, तिची घरभाडे व वेगळ्या निवासाची विनंती फेटाळणे न्यायाच्या दृष्टीने योग्य होईल. सबब, मी मुद्दा क्रमांक २ चे उत्तर होकारार्थी व मुद्दा क्रमांक ३ व ४ चे उत्तर अंशतः होकारार्थी नोदंवुन मुद्दा क्रमांक

५ व ६ च्या उत्तरार्थ खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

**०१.** अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

**०२.** गैरअर्जदार क्र. १ ला असे आदेशीत करण्यात येते की, त्याने अर्जदार क्र. १ व २ यांना दरमहा रक्कम रुपये २,०००/– (अक्षरी रुपये दोन हजार फक्त) अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासुन अंतरिम खावटी/पोटगी मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत देत राहावी.

**०३.** गैरअर्जदार क्र. १ ला असे आदेशीत करण्यात येते की, त्याने अर्जदार क्र.१ हिचा कोणत्याही प्रकारे कौटुंबिक हिंसाचार करु नये.

**०४.** सदर आदेशाच्या प्रती संबंधित संरक्षण अधिकारी व पोलिस स्टेशन यांच्याकडे योग्य कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावे.

**०५.** सदर आदेशाची प्रत अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ ला मोफत देण्यात यावी.

**०६.** अर्जाच्या खर्चाबाबतचा विचार मुळ अर्जाच्या कामी केला जाईल.

स्वा/–

दिनांक:– ०८.०४.२०२६

**(श्री. हसीम मो. बेग)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र. २) देऊळगांव राजा.

**Certificate :**

I affirm that, the contents of this PDF File are same words for words, as per the original Order.

Name of Clerk : S.M. Nathjogi.
Name of the Court : Civil Judge Jr.Dn. & J.M.F.C. Deulgaon Raja.
Date of uploading : 08/04/2026